PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES Vol 1, Issue 1

# भारतातील औद्योगिक धोरणे आणि ग्रामीण उद्योग

**प्रा. प्रविण पांडुरंग घोडविंदे**
सोनुभाऊ बसवंत महाविद्यालय शहापूर
पी.एच.डी. संशोधक विद्यार्थी
सावीत्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे **महाराष्ट्र भारत**

**प्रस्तावना :**

औद्योगिक धोरणाची निर्मिती प्रामुख्याने विकास व उन्नती करण्यासाठी केली जाते. औद्योगिक धोरणांचा इतिहास पाहता 1901 साली नेमलेल्या दुश्काळ पाहणी समीतीने दुश्काळाला तोंड देण्यासाठी भारतात औद्योगिकीकरणाची सूचना केली होती. पहिल्या महायुध्दाच्या काळात सरकारने अलीप्तवाद व प्रतिकूल औद्योगिक नीतीत बदल करवून 1916 साली औद्योगिक आयोगाची नियुक्ती केली. युध्दतर काळात भारतीय कारखानदारीला संरक्षण देण्यासाठी 1991 मध्ये उद्योग धंद्याची वाढ हा विशय प्रांतिक सरकारच्या कक्षेत आणला व तेव्हापासून प्रांतिक सरकारने लघु व कुटीर उद्योगधंद्यांच्या वाढीकरीता प्रयत्न केले. 1923 मध्ये सरकारने जकातीविशयी राजकोशीय आयोगाची नेमणूक करून उद्योग धंद्यांना संरक्षण दिले. तसेच पुढे 1945 साली अंतरिम प्रषुल्क मंडळाची नेमणूक करून राश्ट्रहिताच्या दृश्टीने महत्त्वाच्या उद्योगधंद्यांना सरंक्षण दिले थोडक्यात ब्रिटिष कालीन सरकारने दुश्काळ, बेरोजगारी तसेच उत्पन्न वाढण्यासाठी ग्रामीण उद्योगांचे औद्योगिकीकरण व त्यांना संरक्षण देणे गरजेचे आहे व तरच ग्रामीण भागाचा विकास होईल असे स्पश्ट केले.

भारतात स्वतंत्रप्राप्ती नंतर बेकारी, गरीबी, वारंवार पडणार दुश्काळ, लोकसंख्येचे मोठे प्रमाण, मोठ्याा प्रमाणात षेतीवर अवलंबीत्व व अषा विस्कटलेल्या अर्थव्यवस्थेला सुव्यवस्थीत करण्यासाठी परंपरागत उद्योग, ग्रामीण उद्योग, लघु उद्योग यांच्या विकासासाठी एक नियोजनबध्द आराखडा तयार करण्याच्या उद्देषाने औद्योगिक धोरणाची आवष्यकता स्पश्ट केली, भारतातील औद्योगिक धोरणे पुढीलप्रमाणे :

**अभ्यास विशयाची गरज :**

भारत सरकारने देषात औद्योगिक विकासासाठी दुसऱ्या पंचवार्शिक योजनेपासून सुरवात केली आसता विविध प्रकारचे औद्योगिक धोरणे काळानुरुप (1948, 1956,1977,1980,1991) औद्योगिक विकासासाठी राबवण्यात आली. त्यांचा उद्योग क्षेत्रावर मोठ्याा प्रमाणात प्रभाव पडला आसुन ग्रामीण उद्योग त्यास आपवाद मानता येणार नाही. देषातील उद्योगांचा विकास हा त्या देषातील धोरणात्मक (औद्योगिक) पातळीवर अवलंबुन आसतो. त्यामुळे देषातील औद्योगिक विकासात ग्रामीण उद्योगांचे महत्त्वाचे स्थान आसुन त्याचा अभ्यास होणे महत्वाचे वाटते, तसेच प्रादेषीक समतोल राखण्यासाठी ग्रामीण उद्योग महत्वाची भुमिका साकार करतात व त्यांना त्यासाठी औद्योगिक धोरणात मीळालेला षासकीय मदतीचा तुलनात्मक अभ्यास करणे गरजेचे वाटते या अनुषंगाने या विशयाची निवड केली आहे.

**अभ्यास विशयाची उद्दिश्ट्यो :**

1) भारतातील औद्योगिक धोरणांची ऐतीहासीक पार्श्वभुमीचा अभ्यास करणे.

2) भारतातील औद्योगिक धोरणे व ग्रामोद्योग यांचा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

या षोध पेपरमध्ये वरील उद्दिश्टानुरुप अध्यायन करण्यासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात येणार असून अहवाल, मासीका, षोध पेपर, पुस्तके इत्यादी साधनांचा वापर करण्यात आला आहे.

**भारतातील औद्योगिक धोरणाचे मूल्यमापन :**

**1) 1948 चे औद्योगिक धोरण :**

1948 चे औद्योगिक धोरणात मिश्र अर्थव्यवस्थेचे उद्दिश्ट डोळ्यासमोर ठेवून खाजगी व सार्वजनिक क्षेत्राचे महत्त्व स्पश्ट केले व उद्योगांचे चार गटात विभागणी केली.

1) सरकारची पूर्ण मक्तेदारी असलेले उद्योग : उदा. षषास्त्रे, दारूगोला, अणुषक्ती, रेल्वे विज. इ.

2) संमिक्ष क्षेत्रातील उद्योग :उदा. कोळसा, लोखंड, पोलाद, जहाजबांधणी, विमानसेवा इ.

3) सरकारी नियंत्रणाखाली उद्योग : उदा. यात अवजड यंत्रसामुग्री, रसायने, खते, सिमेंट, साखर इ.

4) खाजगी क्षेत्रातील उद्योगः वरील सर्व गटात न बसणाऱ्या उद्योगांचा समावेष यात केला व सरकारचे हस्तक्षेप मान्य केला.

लघु ग्रामोद्योग व 1948 चे औद्योगिक धोरण :

एक व्यक्ती संघटना आणि सहकारी संस्थांना लघुउद्योग व ग्राम कुटीर उद्योगांमुळे भरपूर वाव मिळत असल्यामुळे व त्याचप्रमाणे ह्या उद्योगामुळे देषाच्या औद्योगिक विकेंद्रीकरणास वाव मिळत असल्यामुळे सन 1948 च्या औद्योगिक धोरणासंबंधीच्या ठरावात लघु व कुटीर उद्योगांना व त्यांच्या विकासाला अर्थव्यवस्थेत महत्त्वाचे स्थान दिले गेले.

**2) 1956 चे औद्योगिक धोरण :**

1956 च्या औद्योगिक धोरणात संमिश्र भारताच्या विकासास आवष्यक अषी पूरक वाटचाल ठेवण्यात आली. कारण यात समतोल विकासाचे उद्दिश्टे समोर ठेवण्यात आले. त्यासाठी पुढील षिफारषी सुचविण्यात आल्या.

1) उद्योगांच्या गटाची फेररचना करून सरकारच्या मक्तेदारी असणाऱ्या 17 उद्योगांचा समावेष'अ'सुचित केला आणि'ब' सुचित सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील
उद्योगासाठी12 उद्योग राखून ठेवले व या व्यतिरिक्त राहिलेले सर्व उद्योग खाजगी
क्षेत्रासाठी राखूनठेवले.

2) खाजगी व सार्वजनिक उद्योगांना न्याय व समानतेची वागणूक देऊन स्वतंत्र देण्याचा
पूर्ण प्रयत्न केला.

3) प्रादेषिक विशमता कमी करणे प्रमुख उद्दिश्टे होते.

4) तांत्रिक व व्यवस्थापकीय षिक्षणाची सोय.

5) औद्योगिक विकासात परकीय भांडवलाची भूमिका स्पश्ट केली व धोरण आखले.

6) कामगार हिताचा विचार व आजारी कारखान्याच्या बाबतीत आषादायी दृश्टीकोन.

**लघु ग्रामोद्योग व 1956 चे औद्योगिक धोरण :**

1956 च्या धोरणात असे ठरविण्यात आले की मोठ्याा उद्योगात होणाऱ्या वस्तूच्या उत्पादनावर मर्यादा घालून त्याचप्रमाणे कर आकारणीत भेदाभेद करून आणि वित्त सहाय्यक देऊन लघु व ग्रामोद्योगांच्या विकासाला 1956 मध्ये महत्त्वाचे स्थान देण्यात आले. त्यांची स्पर्धाषक्ती वाढवण्यास सरकार प्रयत्न करील, सहकारी तत्वाच्या आधारे लघुउद्योगांच्या वाढीला प्रोत्साहन दिले जाईल, थोडक्यात लघुउद्योग, कुटीरउद्योग व लहान उद्योगांना विविध प्रकारचे फायदे उपलब्ध करून देवून अषा उद्योगांचे विकास करण्याचे` उद्दिश्ट समोर ठेवण्यात आले.

या उद्योगांच्या विकासामुळे ग्रामीण भागातील श्रमिकांचे कौषल्य, तेथील बचत, श्रमिक व औद्योगिक कच्चामाल या सर्वांचा उत्पादन कार्यासाठी वापर कला जाईल व विकेंद्रीत उद्योगक्षेत्र तयार होण्यास मदत होईल हे महत्त्वाचे उद्दिश्ट 1951 च्या धोरणात मांडण्यात आले.

**3) 1977 चे औद्योगिक धोरण :**

जनता पक्षाच्या सरकारने 1956 च्या धोरणावर कडक टिका करून सर्वसमावेषक असे डिसेंबर 1977 मध्ये नव्या औद्योगिक धोरणाची घोशणा केली. त्याची वैषिश्ट्यो पुढीलप्रमाणे

1) मोठ्याा उद्योगांचे क्षेत्र आणि कार्य यांचे नियमन व नियंत्रण करण्याचे ठरविले.
2) मोठ्याा उद्योग व उद्योगपतीच्या वित्त पुरवठ्याावर नियंत्रण तसेच मक्तेदारी विरूध्द
कायद्याचा वापर.
3) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाचा विस्तार व संयुक्त लघुउद्योगांना साह्यभूत धोरण.
4) तांत्रिक क्षेत्रात पूर्णतः स्वावलंबी होण्याचे उद्दिश्टे

5) ज्या उद्योगातील तंत्रज्ञान भारतात विकसित झाला आहे त्या परदेषी कंपन्यांचे करार नुतनीकरण करणार नाहीत. उदा. बिस्किटे, साबण, पावडर, कॉफी, पंखा इ.
6) आजारी कारखान्याच्या बाबतच्या धोरणात आजारी कारखान्यातील बेकार कामगार प्रष्न, कर, बेरोजगारी इ. विचार करण्यात येऊन निश्काळजी व्यवस्थापकावर बंदी घालण्यात येईल.
7) मालक मजूर संबंध सुधारण्यासाठी कामगारांना व्यवस्थापनात स्थान, कामगार कायदे, अधिकार, भागभांडवलात वाव इ. कार्यात सामावून घेण्यात आले.

**ग्राम लघुउद्योग व 1977 चे औद्योगिक धोरण :**

1977 च्या धोरणात जनता सरकारने लघु उद्योगांचे महत्त्व लक्षात घेऊन ज्या वस्तूचे उत्पादन लघु व ग्रामोद्योगांना षक्य आहे अषा वस्तूचे उत्पादन लघु उद्योग क्षेत्राकडून करण्यात यावे. म्हणजे या धोरणात लघु व ग्रामोद्योगांना महत्त्वाचे स्थान दिले व लघु उद्योगांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

अ) कुटीर उद्योगः घरी बसून घरच्या घरी करता येण्याजोगे उद्योग यात स्वयंरोजगारास मोठा वाव आहे.

ब) चिमुकले उद्योग : यात अषा उद्योगांचा समावेष करण्यात आला की, ज्यात यंत्रसामुग्रीतीलगुंतवणूक 1 लक्षार्पंत व 50000 पेक्षा कमी लोकसंख्येची गावेसुचविले आहेत.

क) लघु उद्योग : यात अषा उद्योगांचा समावेष करण्यात आला की, यात गुंतवणूक मर्यादा 10 लाख व स्थिर भांडवल 15 लाख पर्यंत असेल.

या उद्योगांच्या विकासासाठी सरकारने पुढील षिफारषी सुचविल्या आहेत.

1) पूर्वीच्या 180 वस्तूऐवजी मे 1978 मध्ये 807 वस्तू लघु उद्योगासाठी राखून ठेवण्यात आल्या. (लघु उद्योगांना संरक्षण दिले.)
2) ग्रामीण उद्योगांचा विकास होण्यासाठी जिल्हा उद्योग केंद्राची स्थापना करण्यात आली.
3) औद्योगिक विकास बँकेत (आयडीबीआय) लघु उद्योगांना वित्तीय मदत मिळविण्यासाठी एक कक्षा स्थापन केली.
4)खादी आणि ग्रामोद्योग आयोगाचा विस्तार करणे.
5)ग्रामोद्योगांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानात वाढ करण्याची षिफारस केली.

**4) 1980 चे औद्योगिक धोरण :**

1980 मध्ये पुन्हा काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तेवर आल्यावर 1977 चे औद्योगिक धोरणावर फक्त कागदावरच राहिले अषी टिका करून 23 जुलै 1980 रोजी नवीन औद्योगिक धोरणाची घोशणा केली व हे धोरण 1956 च्या धोरणावर आधारित होते त्या षिफारषी पुढीलप्रमाणे.

1) सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगात नवचैतन्य आणून रोजगार व वित्तीय साधनसामुग्री वाढून

आर्थिक विकास करणे.
2)जादा स्थापित उत्पादन क्षमतेत कायद्याने संमती व स्थापित उत्पादनक्षमतेत वाढविण्यासंबंधीचे धोरण.
3)औद्योगिक आजारपण असणारे उद्योगांना करात सूट व अनुदान देऊन ते पुन्हा स्थापन केलेआणि षासनाच्या ताब्यातील उद्योग राज्यसरकारकडे देण्यात आहे.
4) निर्यात प्रधान उद्योगांना आर्थिक सहाय्य.
5)आधुनिकीकरणाचा विचार करून स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी उच्च औद्योगिक तंत्रज्ञान वापरण्याची परवानगी देण्याचे धोरण.
6) आधुनिकीकरणाची यंत्रणा मोठया उद्योगाबरोबर मध्यम व लघुउद्योगापर्यंत पोहचवण्याचे धोरण.

**ग्राम लघु उद्योग व 1980 चे औद्योगिक धोरण :**

1980 च्या धोरणात वाढत्या किंमती नुसार लघु ग्राम उद्योगांच्या स्थिर भांडवलाची मर्यादा वाढविण्यात आली.

अ) लघु उद्योगांची स्थिर गुंतवणूक मर्यादा 10 लाखावरून 20 लाख केली.
ब) पूरक उद्योगांची मर्यादा 15 लाखावरून 25 लाख केली.
क) ग्राम/चिमुकल्या उद्योगांची मर्यादा 1 लाखावरून 2 लाख वाढविण्यात आली.
ग्रामीण भागात रोजगार वाढविण्यासाठी ग्रामीण उद्योगांवर भर देण्याचे धोरण आखले, तसेच मागास भागात औद्योकिग विकास करण्याच्या दृश्टीने ग्रामोद्योगांची स्थापना करण्याचे ठरविण्यात आले.

**5) 1991 चे औद्योगिक धोरण :**

श्री. नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली स्थापन कॉंग्रेस सरकारने अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंह व उद्योगमंत्रीपी.जे कुरियन यांनी 24 जुलै 1991 रोजी एक ऐतिहासिक औद्योगिक धोरणाची योजना केली. त्यात भारतीय अर्थव्यवस्थेला आंतरराश्ट्रीय अर्थव्यवस्थेचा दर्जा देण्यासाठी प्रयत्न केले गेले. ही अर्थव्यवस्था खाजगीकरण, जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या नवीन पैलूंचा विचार करण्यात आला या धोरणाच्या षिफारषी पुढीलप्रमाणे.

1) सार्वजनिक क्षेत्राकडून उद्योगक्षेत्राच्या विकासाबाबत अपेक्षित असणाऱ्या गोश्टी पूर्ण होऊ षकल्या नाही म्हणून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगाबाबत नवा दृश्टीकोन समोर ठेवून संरक्षणदृश्ट्याा फक्त सात उद्योग सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवले बाकी सर्व उद्योग खाजगीक्षेत्रासाठी मुक्त केले. उदा. षस्त्रनिर्मिती, दारूगोळा, अणुषक्ती, रेल्वे, कोळसा, खनिजे, लोखंड.
2) औद्योगिक धोरणानुसार 18 उद्योग सोडून बाकी सर्व उद्योग परवाना मुक्त केले. फक्त मोठे कारखाने, 10 लाखापेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या षहरापासून 25 कि.मी. दूर असले पाहिजेत.
3) परकीय भांडवलाची गुंतवणूक वाढवून भारताची निर्यात व परकीय तंत्रज्ञान वाढ

करण्यासाठी 51: परकीय गुंतवणूकीस मान्यता दिली.
4)परकीय तंत्रज्ञानासंबंधी बंधने दूर केली व हे सर्व निर्णय खाजगी क्षेत्राकडे सोपविण्यात आले.
5) 1991 मध्ये मक्तेदारी कायद्यात सुधारणा करून भांडवल व गुंतवणूकीच्या आधारे मक्तेदारी कंपनी ठरविल्याचे निकश बंद केले व सरकार निकोप स्पर्धा होण्यासाठी प्रयत्न करील.
6)श्रमिकांच्या हीताचे रक्षण त्यात तंत्रज्ञान, भागीदारीत वाढ, आरोग्य सुविधा, प्रषिक्षण सुविधा, इ. चा समावेष केला.

**ग्राम लघुउद्योग 1991 चे औद्योगिक धोरण :**

1991 चे औद्योगिक धोरण हे लघुउद्योगांना पोशक असून प्रतिस्पर्धा नसून आरक्षण या तत्वावर अवलंबून होते. 6 ऑगस्ट 1991 रोजी लघु, लहान व ग्रामोद्योगासंबंधीचे नविन धोरण जाहीर करण्यात आले त्याची वैषिश्ट्यो पुढीलप्रमाणे :–

1) ग्रामीण व लघु उद्योगांच्या विकासासाठी आरक्षण तत्व हे पूर्वीच्या धोरणानुसार चालू ठेवण्यात आहे.
2) ग्रामीण व लघुउद्योग स्थापन करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या परवानगीची गरज नाही.
3) लघु व ग्रामोद्योगांना सुविधा मिळविण्यासाठी विषेश विभागात नोंदणी करण्याची आवष्यकता नसून त्यासाठी फक्त राज्य सरकारच्या उद्योग संचालनालयात नोंदणी करणे अवषक्य म्हणजे नोंदणीकरणातून मुक्तता मिळाली.
4) लघु उद्योगांच्या भांडवल विकासासाठी या धोरणानुसार कोणत्याही मोठ्याा उद्योगांना लघुउद्योगात 24: भांडवल गुंतवणूकीस वाव देण्यात आली.
5) 'एक खिडकी कर्ज योजना' 20 लाखापर्यंतच्या प्रकल्पांना कर्ज दिले जाईल.
6) लघुउद्योग क्षेत्राच्या अर्थपुरवठ्याच्या गरजासाठी खास वित्तीय संस्थांची स्थापना करण्यात येईल.
7) इतर उद्योगांना लघुउद्योगात सहभागी होण्यास परवानगी.
8) 'मर्यादित भागीदारी कायदा' संमत करणे.
9) 'एकात्मिक मुलभूत सोयी विकास योजना' राबविणे.
10) तांत्रिक विकास कक्ष स्थापन करणे.
11) 'प्रोत्साहन व सेवा' सवलती जिल्हा पातळीवरून देणे. बहुजन उपभोगाच्या वस्तू एका 'ब्रॅडनेम' खाली विकणे.
12) निर्यात विकास केंद्राची स्थापना करणे.
13) महिला उद्योगाची नवीन व्याख्या मांडळी
14) जनता कापड योजनेच्या जागी दुसरी सर्वकश योजना सुरू करणे.
15) हातमाग व हस्तकला क्षेत्रांना अधिक प्रोत्साहन देणे.

16) खादी व ग्रामोद्योग आयोग व राज्य मंडळे यांच्या कार्याची व्याप्ती वाढविणे.

**सारांश :**

थोडक्यात, वरील पाच औद्योगिक धोरणांचा अभ्यास करता हे समजते की, भारतात प्रत्येक औद्योगिक धोरणात ग्रामीण लघु उद्योगांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व लक्षात घेऊन यांनी विषेश स्थान व प्रोत्साहनपर उत्तेजन प्रत्येक औद्योगिक धोरणात देण्याचा प्रयत्न भारत सरकारने केला आहे हे स्पश्ट होते.

## संदर्भसुचीः

1) जोषी लक्ष्मणषास्त्री ''मराठी विष्वकोश खंड 03'' महाराश्ट्र राज्य विष्वकोश निर्मिती मंडळ, मुबंई 1976.
2) जाधव जे. के ''उद्योग मार्गदर्षन'' परिमळ प्रकाषन, औरंगाबाद 1993.
3) रसाल राजेंद्र अ ''भारतीय अर्थव्यवस्था'' सक्सेसफुल पब्लिकेषन, पुणे 2010.
4) देषपांडे विनायक''भारतीय अर्थव्यवस्था'' निराला प्रकाषन, पुणे
5) देषपांडे श्रीधर, देषपांडे विनायक ''भारतीय अर्थव्यवस्था संक्रमण आणी विकास'' हिमालय पब्लिसिंग हाऊस, मुंबई.
7) दत्त गौरव, महाजन अष्विनी ''भारतीय अर्थव्यवस्था'' 2011.
8) खांदारे सुखदेव ''भारतीय अर्थव्यवस्था'' एज्युकेषनल पब्लिषर्स, औरंगाबाद 2014.